



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१०३ ■ शनिवार १८ जानेवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26


बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

## बीड जिल्हा पुन्हा भावंडांच्या हत्याकांडाने हादरला प्राणघातक हल्ल्यात दोन सख्ख्या भावांचा मृत्यू

**बीड, दि.१७- बीड जिल्ह्यात मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. या प्रकरणातील आरोपींना कडक शिक्षा व्हावी, यासाठी सर्वच क्षेत्रातून दबाव वाढला. मात्र तरीही बीडमधील गुन्हे थांबण्याचे चित्र दिसत नाही. गुरुवारी रात्री आष्टी तालुक्यातील वाहिरा नावाच्या गावात दोन सख्या भावांची जमावाने हत्या केली. या घटनेनंतर बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरला आहे. पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेऊन चौकशी सुरु केल्याची माहिती मिळत आहे.**

संतोष देशमुख प्रकरणात भाजपाचे आमदार सुरेश धस पहिल्या दिवसांपासून आक्रमक पद्धतीने आवाज उचलत आहेत. याच सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघात सदर घटना घडली आहे. आष्टी तालुक्यातील वाहिरा येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास काही लोकांनी लोखंडी रॉड, धारदार शस्त्राने तीन भावांवर हल्ला केला. या हल्ल्यात दोन संख्या भावांचा जागीच मृत्यू झाला. तर आणखी एक जण गंभीर जखमी आहे. याप्रकरणी अंभोरा पोलीस अधिक तपास करत आहेत.

अजय भोसले आणि भरत भोसले असे मृत भावांचे नाव असून कृष्णा भोसले हा गंभीर जखमी आहे. हे तिघेही त्यांच्या गावात उभे असताना गावातील आणि बाहेरील काही लोक जमा झाले. यातील काही लोकांनी या तीनही भावांवर शस्त्राने हल्ला चढवला. मारहाण आणि खून नेमका कोणत्या कारणाने झाला? हे मात्र अद्याप समजले नसून आष्टी ग्रामीण (पान ४ वर)

## तृप्ती देसाईंचा आरोप कराड दिंडोरीतील आश्रमात होता!

मुंबई, दि.१७-मस्सोजगाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या आणि भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख तृप्ती देसाई यांनी उडी घेतली आहे. वाल्मिक कराड संदर्भात तृप्ती देसाई यांनी पत्रकार परिषदेमध्ये मोठा गौप्यस्फोट केला. वाल्मिक कराडला वाचवण्याचे प्रयत्न होत (पान ४ वर)



## इम्रानखानला चौदा वर्षे, पत्नीला सात वर्षे शिक्षा

कराची, दि.१७- पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान आणि त्यांची पत्नी बुशरा बिबी यांना १९० दशलक्ष पौंडच्या अल-कादिर ट्रस्ट प्रकरणात भ्रष्टाचार केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे. यानंतर या इम्राम खान यांना चौदा वर्ष तर त्यांच्या पत्नीला सात वर्षांच्या तुरूंगवासाची शिक्षा सुनावण्यात आळी आहे. लाचलुचपत प्रतिबंधक न्यायालयाचे न्यायाधीश नसीर जावेद राणा यांनी या प्रकरणातील निकाल दिला. यापूर्वी (पान ४ वर)

## आंतरराज्यीय टोळी अटकेत; नंदुरबार एलसीबीची कामगिरी तेविस लाखांचा मुद्देमाल जप्त, एसपी श्रवणदत्त यांची माहिती

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी) - जिल्हा पोलीस वसाहतील अज्ञात चोरट्यांनी लंपास केलेले दागिने पोलिसांनी हस्तगत केले असून मध्यप्रदेशात जावून ही कारवाई करण्यात आली. यामुळे आंतरराज्यीय चोरट्यांची टोळी कार्यरत असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांच्याकडून सुमारे २३ लाख ३४ हजाराचे दागिने जप्त करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक श्रवण दत्त यांनी पत्रकार परीषदेत दिली. जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयातील संवाद सभागृहात घेण्यात आलेल्या पत्रकार परीषदेत अपर पोलिस अधिक्षक आशित कांबळे, उप विभागीय पोलिस अधिकारी संजय महाजन आर्दीसह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील आदी उपस्थित होते.**



पोलिस अधिक्षक श्रवण दत्त एस. म्हणाले, पोलिस वसाहतीत ३० डिसेंबरला चोरीची घटना घडली. यात साधारण ४ लाखांचे सोन्याचे दागिने तसेच रोकड लंपास करण्यात आली होती. या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास सुरु असतांना ८ जानेवारी रोजी पो.नि. हेमंत पाटील यांना सदर गुन्हा हा मध्यप्रदेश राज्यातील आरोपींनी केले असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. स्थानिक गुन्हे (पान ४ वर)



## अक्कलपाडा धरणातील डाव्या कालव्याचे पाणी पोहचले शेतात

**धुळे, दि.१७- रब्बी हंगामाच्या शेतातील पिकांना वेळेवर पाणी मिळावे यासाठी शेतकऱ्यांचे हक्काचे पाणी अक्कलपाडा धरणातील डाव्या कालव्यातुन शेतात सोडण्यात आले. शुक्रवारी शेतकऱ्यांच्या उपस्थितीत धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांच्या हस्ते कालव्यात पाणी सोडण्यात आले.**

तालुक्यातील शिरधाने, खंडलाय बु, खंडलाय खू. बांबूर्ले, निमडाळे, गुलाबवाडी, कावठी, मेहेरगाव सोबत अनेकगावांना रब्बी हंगामाच्या पिकांना पाण्याची समस्या निर्माण झाली होती. या विषयी शेतकऱ्यांनी आ.राम भदाणे यांच्याकडे पाणी सोडण्यासाठी मागणी केली होती. परिस्थितीची माहिती घेऊन आ.भदाणे यांनी अक्कलपाडा धरणातील डाव्या कालव्याचे पाणी शुक्रवारी शेतात सोडले. यावेळी माहिती देताना आ.भदाणे यांनी सांगितले कि, अक्कलपाडा धरणातील हे पाणी रब्बी हंगामाला संजीवनी ठरणार आहे. तसेच विहीरीना जिवंत पणा येईल. यामुळे जनावरांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. शेतकऱ्यांचे हक्काचे पाणी त्यांना मिळाले याचा मला आनंद वाटला. कालव्याच्या माध्यमातून शेतात पाणी (पान ४ वर)

## गुड्ड्या खून प्रकरणी विजय गोयरला जामीन

धुळे, दि.१७- गुड्ड्या उर्फ रफियुद्दीन शफीयुद्दीन शेख याच्या हत्येमधील अठरावा आरोपी विजय शामराव गोयर उर्फ बडाबाबा याचा मंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जामीन अर्ज मंजूर केला आहे. आरोपीतर्फे ॲड.राहुल कर्पे व ॲड.प्रशांत आर.सोनार यांनी काम पाहिले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.संजय देशमुख साहेब यांच्या न्यायालयात तीन दिवस कामकाज चालले. विजय शामराव सोनार उर्फ बडाबाबा हा गुड्ड्या केसमधील एकोणावीस पैकी अठरावा आरोपी होता. एकोणाविसावा आरोपी शाम गोयर याचा मृत्यू झाला आहे. विजय गोयर यास न्यायालयाने आज जामीन दिला आहे.

## मोबाईलचे कर्ज चढवून फसवणूक पो.अधि.धिवरेंना शिष्टमंडळ भेटले

**धुळे, दि.१७- पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी गरीब फसवणूक झालेल्यांना कसे सोडवता येईल यावर भर देत चौकशीची चक्रे वेगात फिरवण्याचे आदेश आज दिले. मोबाईल फोन घेवून कर्ज चढवल्याप्रकरणी आज पंचवीस जणांच्या शिष्टमंडळाने भेट घेतली व संपूर्ण प्रकरणाची माहिती पोलीस अधिक्षकांना दिली. यावेळी एल.सी.बी. चे अधिकारी देखील उपस्थित होते.**

नवीन महागड्या मोबाईलचे कर्ज लोकांच्या भोळेपणाचा फायदा घेत सर्वसामान्य व गरीबांच्या खात्यावर चढवण्यात आले आहे. या फसवणूक झालेल्यांतर्फे ॲड.चैतन्य मोहन भंडारी व हेमंत मदाने यांनी शिष्टमंडळासह भेट घेतली. यावेळी फसवणूक झालेल्यांचे हप्ते कापणे त्वरित बंद करा. सापडत नसलेल्या फायनान्स कंपनीचे प्रतिनिधी प्रसाद सज्जन चौधरी याला अटक करा. मोबाईल विक्रेत्यांच्या दुकानात असणारे सीसीटीव्ही फ ूटेज जप्त करा. या फसवणुकीच्या गुन्ह्यात दुकानदारापासून अनेक जण गुंतलेले आहेत त्यांचा छडा लावा आदी मुद्दे चर्चेत उपस्थित केले होते.

यावेळी (पान ४ वर)

## शिरपूर बाजार समिती सोमवारपासून बंद

शिरपूर दि.१७ (का.प्र.)- शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील हमाल मापाडी संघटनेतर्फे हमाली व तोलाई मजुरीत वाढ करण्याची मागणी करण्यात आली असून ती पूर्ण होईपर्यंत बेमुदत काम बंद ठेवण्याचे जाहीर केले आहे. संघटनेने त्याबाबत बाजार समितीला पत्र दिले असून या काम बंद आंदोलनामुळे २० जानेवारीपासून बाजार समिती मधील शेतमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार बंद ठेवण्यात येतील असे बाजार समिती प्रशासनाने कळवले आहे. तथापि बुधवारी व शनिवारी होणारे कांद्याचे खरेदी विक्री व्यवहार नियमित सुरु राहतील असे बाजार समितीतर्फे सांगण्यात आले.



## मोहाडी रेल्वे स्थानक नुतनीकरणास आर्थिक मंजुरी; खा.डॉ.बच्छाव

**धुळे, दि.१७- केंद्रीय भारतीय रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश कुमार यांच्याशी खा.डॉ. शोभा बच्छाव यांनी भेट घेत विविध मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा केली. मोहाडी रेल्वे स्थानक नुतनीकरणासाठी मंजूरी देण्याचे निर्देशही देण्यात आल्याची माहिती खा.डॉ.शोभा बच्छाव यांनी दिली आहे.**

बोरविहीर धुळे नरडाणा रेल्वे मार्ग, मनमाड - धुळे - इंदूर रेल्वे लाईन व धुळे रेल्वे स्थानकाची पाहणी करणे आणि उद्घाटनासाठी केंद्रीय रेल मंत्री ना. अश्विनी वैष्णव यांना आमंत्रित करण्याबाबत देखील चर्चा झाली. यात मनमाड-धुळे-इंदूर रेल्वे विभागातील दैनंदिन अडथळ्यांची माहिती घेणे, धुळे-पुणे-धुळे ही रेल्वे सेवा या आधीही सुरू होती मात्र कोरोनाच्या काळात ती बंद करण्यात आली होती. ती देखील पूर्ववत सुरु करणे याबाबत देखील सकारात्मक चर्चा झाली.

धुळे येथे कापूस उत्पादक व धान्य उत्पादक तसेच गहू, तांदूळ, सिमेंट, गहू व कापड व इतर यांच्यासाठी गोदामे बांधण्याबाबत आणि मालेगाव येथील प्रस्तावित रेल्वे स्थानक व प्रवासी व्यवस्था तसेच मालधक्का (पान ४ वर)

## पाच दुकानदारांसह दोघांनी चौसष्ट मोबाईल विकले सी.सी.टी.व्ही.फूटेज जप्त; प्रसाद चौधरी सापडला

**धुळे, दि.१७- धुळे एल.सी.बी.तर्फे मोबाईलवर कर्ज चढवून फसवणूक करणाऱ्यांच्या विरोधात वेगाने चक्रे हलवण्यास सुरुवात केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार आज धुळे शहरातील मोबाईल विक्रेत्यांच्या दुकानातील सीसीटीव्हीचे फुटेज ताब्यात घेण्यात आले आहेत. पाच दुकाने व दोन खाजगी व्यक्ती अशांकडून एकूण ६४ किंमती म ोबाईल विक्री झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सापडत नसलेला फायनान्स कंपनीचा कर्मचारी प्रसाद सज्जन चौधरी यास आज एल.सी.बी.ने ताब्यात घेतले आहे. कमी किंमतीत महागडे मोबाईल घेणाऱ्यांकडून काही फोन परत मिळवण्यात यश आले आहे. धुळे न्यायालयात खुशाल सोनार व गणेश पुनम चंद चौधरी रा.श्रीरंग कॉलनी, देवपूर यांना २० जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.**

धुळे एल.सी.बी.बरोबर दुपारुन झालेल्या एका बैठकीत पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी अनेक सुचना दिल्या. एलसीबी पीआय श्रीराम पवार व एलसीबीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण पारधी यांनी आज तपासाची सुत्रे वेगाने हलवली. एलसीबीने आज मा.चिफ न्युडिशियल मॅजिस्ट्रेट जयश्री पुनावाला मॅडम यांच्या न्यायालयात खुशाल सोनार व गणेश चौधरी यांना हजर केले होते. यावेळी (पान २ वर)

## शहरात एक दिवस उशीराने पाणीपुरवठा

धुळे, दि.१७- शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या तापी पंपिंग स्टेशनसह जलवाहीनीला विविध ठिकाणी गळती लागली आहे. गळती बंद करण्यासाठी दि.१८ जानेवारी रोजी दुरूस्तीची कामे केली जाणार आहे. यामुळे शहरात एक दिवस उशीराने पाणी पुरवठा केला जाणार असल्याची माहिती पाणी पुरवठा अधिकारी नवनित सोनवणे यांनी दिली आहे.सुकवद पंपिंग स्टेशन जवळ दोन, वर्षी गाव पाईप फॅक्टरी जवळ एक, नरडाणा येथील दुध डेअरी जवळ दोन, बाभळे (पान ४ वर)

## अधिकारी असल्याचा बनाव करीत तेरा लाखांची लूट; तिघांना अटक

**धुळे, दि. १७- एमएसईबीचे मुख्या कार्यकारी अधिकारी असल्याचा बनाव करून ईलेक्ट्रीकल वस्तुंची विक्री करणाऱ्या दुकानदाराची तेरा लाखांत ऑनलाईन फसवणुक करणाऱ्या तिघांच्या धुळ्यातील सायबर पोलीसांनी मुसक्या आवळल्या आहेत. चार महिने सातत्याने शोध घेवून गुजरात राज्यातील सुरत येथून तीघांना अटक केली आहे.**

शहरतील श्रीकृष्णा इंटरप्रायजेस धुळे या नावाने ईलेक्ट्रीकल फर्म चालविणारे जिजाबराव आनंदराव पाटील यांना महाराष्ट्र विज वितरण कंपनीचे व्यावस्थापकीय अधिकारी लोकेश चंद्रा यांचे महत्वाचे काम आहे. त्यांचा फोन आला की फोन उचला असा फोन आल्यानंतर लगेच काही वेळात जिजाबराव पाटील यांच्या मोबाईलवर अनोळखी नंबरवरून फोन आला. मै लोकेश चंद्रा बोल रहा हु. (पान ४ वर)


सेवा
सुपर स्पेशालिटी न्युरोट्रॉमा व क्रिटीकल केअर सेंटर

PATIENT SAFETY & QUALITY OF CARE NABH (ENTRY LEVEL) PRE ACCREDITED


### सुप्रसिद्ध यूरोलॉजिस्ट तज्ञ यांच्याकडून मोफत तपासणी व मार्गदर्शन शिबीर

आपणास कळविण्यात आनंद होतो कि सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर धुळे यांच्या तर्फे मूत्र रोग संबधित तपासणी व मार्गदर्शन शिबीर करण्यात आले आहे.

खालील लक्षणे आढळून आल्यास आवर्जून शिबिरात यावे.

मूत्र रोग संबंधित आजार | मूत्र पिंड | मूत्र मार्ग
मूत्राशय या सदर्भातील आजार

डॉ. आशिष छाजेड
UROLOGIST MS, MCH



सोनोग्राफी अल्प दरात

वार. रविवार दि. - १९/०१/२०२५ वेळ - ११ ते ३ पर्यंत.
ठिकाण - सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर
मिशन कंपाऊंड, साक्री रोड, धुळे ☎ 02562 - 246333, 247555


## शिंदखेड्यात पत्रकारावर रेती माफियांकडून प्राणघातक हल्ला

**धुळे, दि.१७- शिंदखेडा तालुक्यातील मौजे निसाने येथील पत्रकार जतीन नगराळे यांच्यावर वाळू माफियांनी प्राणघातक हल्ला केला त्यात ते गंभीर जखमी झाले आहेत. याबाबत संविधान संरक्षण समितीच्या वतीने धुळे जिल्हा पोलीस उपाधीक्षक विश्वजीत जाधव यांना निवेदन देण्यात आले.**

मौजे निसाणे ता. शिंदखेडा जि. धुळे येथील नदीतील अवैध वाळू माफीया गौण खनिजाची चोरीच्या गैरकृत्यास पत्रकार जतीन नगराळे यांनी विरोध केला. त्याचे वाईट वाटून अवैध धंद्यात अडसर ठरणाऱ्यांचा कायमचा खातमा करण्याचे उद्देशाने दि. १४ जानेवारी २०२५ रोजी रात्री सुमारे अकरा जणांनी संघटीत विचार विनीमय करुन सशस्त्र हल्ला करुन खुन करण्याचा प्रयत्न केला. जतीन नगराळेंच्या घरात जबरदस्तीने घुसुन तोडफोड केली. महिला मध्ये आल्याने त्यांना मारहाण करुन जाती वाचक शिवीगाळकरुनमहिलांचाविनयभंग केला. व मारहाण करत असताना हल्लेखोर (पान ४ वर)


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -73,050 रु.+3% GST
सोने- 24 K -79,800 रु.+3% GST
चांदी- 95,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


### १० वे स्मृतीदिन



**कै.पंडित मोतीराम माळी**
मु.शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे (स्वर्गवास : १८/१/२०१६)

नानासाहेब आपण एकत्र कुटुंबासाठी अपार कष्ट घेतले. आपल्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच परमेश्वराजवळ प्रार्थना!

✻ शोकाकुल ✻

| | |
|---|---|
| आत्माराम पंडित माळी (मुलगा) | देवीदास पंडित माळी (मुलगा) |
| मधुकर पंडित माळी (मुलगा) | प्रकाश पुंडलिकराव माळी (भाचा) |
| दिलीपकुमार मगनराव पाटील (भाचा) | कृष्णा मोतीराम रोकडे (भाऊ) |
| जगन्नाथ मोतीराम रोकडे (भाऊ) | नितीनकुमार कृष्णा रोकडे (पुतण्या) |
| बिपिनकुमार कृष्णा रोकडे (पुतण्या) | हिरालाल जगन्नाथ रोकडे (पुतण्या) |
| किशोर जगन्नाथ रोकडे (पुतण्या) | रघुनाथ अर्जुन रोकडे (पुतण्या) |

पांडूरंग अर्जुन रोकडे (पुतण्या)

### भावपूर्ण श्रध्दांजली..!



**सौ.रमादेवी विनोदशेठ अग्रवाल**
(स्वर्गवास : ०९/०१/२०२५)

परिवार जिसका मंदिर था, स्नेह जिसकी शक्ती थी
परिश्रम जिसका कर्तव्य था, परमार्थ जिसकी भक्ती थी
ऐसी आपकी दिव्य आत्मा को ईश्वर शांती प्रदान करे..!
ऐसी अपनी पावन स्मृती पर भावभिनी श्रध्दांजली व सुमनांजली

-------: श्रध्दावनत् :-------

राधा भजनी महिला मंडळ, अग्रवाल नगर, धुलिया

# आपला महाराष्ट्र

## डॉ.नानासाहेब देशमुख यांचा स्तुत्य निर्णय

गीताईच्या दुसऱ्या अध्यायात स्थित प्रज्ञाची लक्षणे सांगितली आहेत. ती अमलात आणल्यास प्रत्येकाच्या जीवनात शांती आणि समाधान लाभेल. त्या संदर्भात कोणी विचार करत नाही हा भाग वेगळा. समाजकारण आणि राजकारणात तर या लक्षणांचा दूर दूर पर्यंत संबंध येत नाही. क्रोध, मद, मत्सर, बदल्याची भावना, वैर हे दुर्गुण पूर्णपणे सध्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात भरलेले दिसतात. त्यावर जो कोणी अंमल करेल तो मोठा मानला जातो. आणि स्थितप्रज्ञाची लक्षणे आपल्या जीवनात अमलात आणण्याचा प्रयतक करणाऱ्यांना वेडा मानले जाते अशी सध्या अवस्था आहे. विषयांचे करी ध्यान त्यास तो संग लागला, संगातूनि फुटे काम क्रोध कामात ठेविला, क्रोधातूनि जडे मोह, मोहाने स्मृति लोपली, स्मृति- लोपे बुद्धी –नाश म्हणजे आत्मनाशचि !! राग द्वेष परि जाता आली हातात इंद्रिये, स्वामित्वे विषयी वर्ते, त्यास लाभे प्रसन्नता, प्रसन्नते पुढे सर्व दुःखे जाती झडूनिया, प्रसन्नतेने बुद्धीची स्थिरता शिघ्र होत असे !! हे तत्त्वज्ञान जीवनोपयोगी असल्याने ज्यांनी ज्यांनी त्याचा वापर केला त्यांना यशस्वी जीवन जगण्याचा सूर गवसला असे मानले पाहिजे. धुळे जिल्ह्यातील राजकारण समाजकारण आणि वैचारिक क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहिलेले डॉक्टर नानासाहेब हेमंत देशमुख यांनी गीताईतील या तत्त्वांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला आहे. आता त्यांनी राजकीय क्षेत्रातून पूर्णपणे निवृत्त होण्याची घोषणा केलेली असून मूल्याधारित राजकारणात तरुणांची पिढी यावी यासाठी ते प्रयत्न करणार आहेत. ज्यांच्या ज्यांच्याशी आपले मतभेद झाले, शत्रुत्व निर्माण झाले, संघर्ष झाला, त्यांच्याशी यापुढे मैत्रीपूर्ण व्यवहार आपण करू अशीही घोषणा त्यांनी केली आहे. त्यांचा हा निर्णय आणि त्या संदर्भातील घोषणा स्वागतार्ह असून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात येणाऱ्या नव्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारी आहे. विशेष म्हणजे त्यांनी रावल परिवाराशी निर्माण झालेल्या दीर्घ संघर्षाचा उल्लेख करून तो संपुष्टात आणण्याचा आणि पुढील काळात मैत्रीपूर्ण सहकार्य करण्याचा मनोदय व्यक्त केला तो पूर्ण दोंडाईचा शहर आणि शिंदखेडे तालुक्यातील वैरत्व निभावणाऱ्या सर्वांसाठी उपयुक्त आहे. अशा सर्वांनी याबाबतच्या सकारात्मक निर्णयाचे स्वागत करून आपल्या आयुष्यात देखील तो अमलात आणावा अशी अपेक्षा आहे. रावल परिवाराकडून देखील या घोषणेचे स्वागत होऊन मैत्रीचा हात पुढे येणे सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या आरोग्यदायी ठरणार आहे.

सांडूनिया जर्जर जीर्ण वस्त्रे, मनुष्य घेतो दुसरी नवीन, तशीची टाकूनी जुनी शरीरे, आत्माही घेतो दुसरी निराळी. हे वचन देखील गीताईत आहे. त्या पद्धतीने जुनी जळमटे काढून टाकून नव्या प्राकृतिक, प्रागतिक, आणि सकारात्मक, विधायक वृत्तीकडे वळणे हे उत्तम मनुष्याचे लक्षण म्हणावे लागेल. त्या दिशेने डॉक्टर देशमुख यांनी पाऊल टाकले ते आशादायी ठरते. आपल्याकडे राजकीय क्षेत्रात शरीर जर्जर होईपर्यंत जागा सोडण्यास लोक तयार नसतात याचा अनुभव आपण सर्वत्र घेत आलेलो आहोत. राजकीय क्षेत्रात येण्यासाठी नवी पिढी तयार करावी लागत नाही. ती सध्याच्या झगमगाटी राजकारणामुळे सहज आकर्षित होते. ह्या कोऱ्या पाट्या संस्काराशिवाय आलेल्या असल्याने राजकारणात शुद्धता येऊ शकलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉक्टर नानासाहेब देशमुख आणि त्यांची समकालीन पिढी किमान पथ्ये पाळणारी होती. तो वारसा नव्या पिढीच्या हातात देण्यासाठी आपण प्रयतक करणार आहोत हे त्यांचे विचार आश्वासक असून त्याचीच आज गरज आहे. आजच्या राजकारणात धार्मिक अधिष्ठान असलेल्या संघटना खूप सक्रिय झालेल्या दिसतात.त्यात तरुण पिढीचा भरणा मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र तो उत्पादक असून विधायक अथवा समाजोपयोगी उत्पादक नाही. ज्या विधायक आणि पुरोगामी बिगर राजकीय संस्था संघटना अस्तित्वात होत्या त्यात मात्र नव्या पिढीचा अभाव जाणवतो. त्या त्या संघटनातील पूर्वसुरींनी जबाबदारीची पदे आणि संस्था अखेरपर्यंत स्वतःच्याच ताब्यात ठेवल्यामुळे नव्या पिढीला संधी मिळाली नाही. त्यामुळे नवी पिढी अशा कार्यात येऊ शकली नाही. परिणामी वरिष्ठ कार्यकर्ते संपले, तशाच संस्था संपल्या आणि संघटना ही कमकुवत झाल्या. त्या पुन्हा परिपुष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि तसे प्रयत्न नानासाहेब देशमुख करणार आहेत याचा आनंद आहे.

डॉक्टर देशमुख आणि रावल परिवार यांच्यातील राजकीय संघर्ष सर्वश्रुत आहे. तो काही नवीन नाही. दोन्हीकडून एकमेकांना शहप्रतिशह देण्याचे काम झाले. ते कुठेतरी थांबले पाहिजे असे अनेकांना वाटत होते. तसे प्रयतक देखील कोणी केले नाहीत. त्यामुळे वितुष्ट कायम राहिले. मात्र आता ते संपविण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतल्याने निर्वैर, आणि मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण होईल अशी शक्यता निर्माण झाली आहे. तसे तर रावल परिवारातील राजकीय क्षेत्रात काही काळ व्यतित करणारे बापूसाहेब रावल, डॉ. नानासाहेब देशमुख, कांतीलाल जैन, सुदाम तात्या राजपूत, गोविंद भाऊ, नारायण साठे, आदींची दीर्घकाळ मैत्रीपूर्ण वैचारिक बैठक होती. त्यामुळे दोंडाईच्यातील वातावरण देखील सौहार्द पूर्ण होते. राजकारणाचे संदर्भ बदलले तसे मग काळाचेही संदर्भ बदलले. राजकारण द्वेषाच्या उंबरठ्या पर्यंत पोहोचले. असे असले तरी व्यक्तिगत पातळीवर बापूसाहेब रावल, डॉ.देशमुख यांच्यात कधी वितुष्ट निर्माण झाले नाही. मैत्री त्यांनी जपली. तो धागा धरून आता पुढे जाता येईल. एक काळ असा होता की सहकार महर्षी पी.के.अण्णा पाटील आणि मोहन भाई चौधरी यांच्यात विस्तव जात नव्हता. समाजात देखील त्यामुळे दोन तट पडलेले होते. मात्र एके दिवशी मोहन भाई चौधरी यांनी समंजस भूमिका घेऊन, शत्रुत्व संपले, वैर संपले, संघर्ष संपला आता जवळ येऊ अशी घोषणा केली होती. त्यामुळे वातावरणात एकदम बदल झाला होता. सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला होता. राजकारण आणि समाजकारणात सौहार्द निर्माण झाले. अशाप्रकारे माणसाच्या जीवनात सदा सर्वदा संघर्ष, शत्रुत्व कायम राहू शकत नाही. कुठेतरी, केव्हातरी थांबले पाहिजे. हे सूत्र प्रत्येकाच्या जीवनाशी निगडित असून फारच उपयोगी आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉ. नानासाहेब देशमुख यांनी राजकीय जीवनातून घेतलेली निवृत्ती, आणि सहकाराची भूमिका महत्त्वाची आहे. अनेक संस्थांचा कारभार त्यांनी चालविला, आमदारकी भोगली आणि मंत्रीपद उपभोगले. त्यातून जनकल्याण साधण्याचा प्रयतक केला. त्या प्रयतकात चुका होऊ शकतात याची त्यांना नम्र जाणीव आहे कारण ते गीताईचे अभ्यासक आहेत. त्यांची वृत्ती विधायक आणि सकारात्मक आहे.

## कैलास खेरच्या धमाकेदार कार्यक्रमाने जिंकली मने
## मंत्री रावल यांच्या वाढदिवसानिमित्त अभिनव कार्यक्रम



**दोंडाईचा, दि.१७- राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या वाढदिवसानिमित्ताने दोंडाईचा येथे बॉलिवूडचे प्रसिद्ध गायक कैलास खेर यांच्या गाण्यांच्या कार्यक्रम संपन्न झाला. त्यांच्या गाण्यांच्या धमाकेदार परफॉर्मन्सने दोंडाईचा करांची मने जिंकली, त्यांच्या प्रत्येक गाण्यांवर तरुणाईसह महिला थरकल्या. यावेळी दोंडाईचाकरांनी कार्यक्रमाला तुफान गर्दी केली होती.**

मंत्री जयकुमार रावल यांच्या वाढदिवसानिमित्ताने दोंडाईचा येथील अप्पासाहेब मैदानावर बॉलिवूडचे प्रसिद्ध गायक कैलास खेर यांच्या गीत गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला दोंडाईचाकरानी एकच गर्दी केली होती. संपूर्ण मैदान अक्षरशः फुल्ल झाले होते. दोन तास चाललेल्या या कार्यक्रमा गर्दी कमालीची होती, तसेच प्रेक्षकांचा उत्साह ही प्रचंड होता. त्यांच्या प्रत्येक गाण्यांवर तरुणाई सह महिला थिरकत होत्या. त्यांच्या धमाकेदार परफॉर्मन्सने दोंडाईचाकराची मने जिंकून घेतली. या कार्यक्रमाला मंत्री जयकुमार रावल, जेष्ठ उद्योगपती सरकारसाहेब रावल, माजी नगराध्यक्षा नयनकुंवरताई रावल, मंत्री रावल यांच्या धर्मपतकी सुभद्रादेवी रावल, कन्या वेदांतेश्वरी रावल, धुळे ग्रामीण चे आमदार राम भदाणे यांच्या जिल्हाभरातील पदाधिकारी, कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सोनगीरमधील अविनाश महाजन मित्र परिवारातर्फे गरिबांना चादरींचे वाटप

**सोनगीर दि.१७ (प्रतिनिधी) - परिसरातील उघड्यावर झोपणाऱ्यांचा थंडीपासून बचाव व्हावा म्हणून त्यांना येथील अविनाश महाजन मित्रपरिवार व जोशाबा क्रीडा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने चादरींचे वाटप करण्यात आले.**

सध्या प्रचंड थंडी पडत असून या थंडीच्या दिवसात मोलमजुरी करणारे गरीब लोक पक्क्या निवाऱ्या अभावी झोपडी करून किंवा अनेकदा उघड्या आकाशाखाली झोपतात. यांच्याकडे पांघरण्यासाठी पुरेसे पांघरून नसते. त्यामुळे अंगावरील कपड्यांच्या भरवशावर थंडीत झोपतात. अश्यात लहान मुले व वृद्धांची अवस्था फारच बिकट होते. गोरे गरिबांची ही अडचण लक्षात घेऊन येथील अविनाश महाजन मित्रपरिवार व जोशाबा क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष रुग्णमित्र दिलीप माळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सोनगीर परिसरातील मोलमजुरी करणाऱ्या व झोपड्या बांधून राहणाऱ्या लोकांना सुमारे १०० चादरींचे वाटप वाटप केले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य अविनाश महाजन, जोशाबा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष रुग्णमित्र, दिलीप माळी माळी, समाजाचे अध्यक्ष रवींद्र माळी, विकास कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अशोक माळी, प्रमोद धनगर, रोशन जैन, जितेंद्र पाटील, राजू पाडवी आदी यावेळेस उपस्थित होते.

## प्रा.डागा यांचा बीजेएसच्या साक्री शाखेकडून सन्मान

**शिंदखेडा, दि.१७ (प्रतिनिधी) - भारतीय जैन संघटना (बीजेएस) साक्री शाखेकडून प्रा.चंद्रकांत डागा यांचा स्वामी विवेकानंद पुरस्काराने सन्मान करण्यात आला.**



साक्री येथील अरिहंत भवनात बीजेएसच्या नाविन कार्यकारिणीचे पदग्रहण व शपथ विधी समारोह पार पडला. डागा हे गेल्या ३५ वर्षापासून भारतीय जैन संघटनेत कार्यरत असून ते सध्या खानदेश विभाग अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे. या माध्यमाद्वारे त्यांनी कोरोना काळात मोबाइल व्हॅन द्वारा शिंदखेडा तालुक्यांत डॉक्टरांचे पथक नेऊन रुग्णांची तपासणी करून प्राथमिक उपचार केलेत. पाणी फाउंडेशनच्या माध्यमाने संघटनेच्या तलाव खोलीकरणासाठी कार्य केले. तसेच जैन श्री संघाचे बरेच वर्ष ते सचिव होते. यातून साधू संतांची व समाजाची सेवा करण्याचा संधी मिळाली. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना हे सन्मानपत्र साक्री शहरचे बीजेएसचे नूतन अध्यक्ष विजय राजेंद्र टाटीया, प्रतीक टाटिया उपाध्यक्ष, भुषण कोचर सचिव, डॉ.निलेश कर्णावट व संयम पगरिया सहसचिव, पीयूष कर्नावट, शहर कार्याध्यक्ष, विशाल पारख, महामंत्री राहूल कांकरिया खजिनदार यांनी दिला. याप्रसंगी साक्री जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्र टाटीया, तेरा पंथचे अध्यक्ष अनिल कांकरिया, महीला मंडळ अध्यक्ष कांताबाई पारख, बीजेएस खानदेश उपाध्यक्ष जोशीला पगारीया, सचिव प्रकाश जैन, कोषाध्यक्ष सचिन कोठारी, सदस्य अजीत टाटीया, धुळे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष संदिप मूनोत, उपाध्यक्ष निखील टाटीया, सदस्य निखील सांडेचा, आतिश सेठिया व समाज बांधव उपस्थित होते.



## वेल्हाणे येथे युवा सप्ताह निमित्त प्रतिमापूजन

धुळे, दि.१७- तालुक्यातील वेल्हाणे येथे स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय संस्थेतर्फे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात कुंडाणे गावचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.पंकज पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले व युवा सप्ताहाच्या निमित्ताने वृक्षारोपण करून जयंती साजरी करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून गावातील स्मशानभूमी परिसरात वडाच्या रोपांचे वृक्षारोपण करून त्याची संगोपनाची जबाबदारी संस्थेने घेतली. याप्रसंगी स्वामी विवेकानंद संस्थेचे अध्यक्ष जयदीप पवार, प्रवीण बोरसे आनंदा मराठे, अविनाश वाघ जितेंद्र बोरसे राजेंद्र पाटील, सतीश मराठे, बाबूलाल भगत, मोतीलाल वाघ आदी उपस्थित होते.

## आर.सी.पटेल आय.एम.आर.डी.तर्फे आज राज्यस्तरीय कॉन्फरन्स

**शिरपूर, दि.१७- आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट (आय.एम.आर.डी.) शिरपूरतर्फे मल्टी-डिसिप्लिनरी रिसर्च फॉर सस्टेनेबल सोल्युशन्स या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कॉन्फरन्सचे आयोजन १८ जानेवारी रोजी एस.एम. पटेल ऑडिटोरियम हॉल मध्ये करण्यात येत आहे. ही कॉन्फरन्स ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतींनी आयोजित केली जाईल.**

कॉन्फरन्सचे उदघाटन व बीजभाषण डॉ.मनोज देवरे (प्रोफेसर व हेड ऑफ इन्स्टिटयूट, ए.एम. आय.टी.वाय. युनिव्हर्सिटी, मुंबई) करणार असून मान्यवर पाहुण्यांमध्ये डॉ. सतीश कोल्हे (प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर, पी.एम.उषा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), प्रा. आशुतोष पाटील (प्रोजेक्ट हेड, पी.एम.उषा सॉफ्ट कॉम्पोनन्ट, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव), प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा (व्यवस्थापन परिषद सदस्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव) व डॉ. जे.बी. पाटील (संचालक, आर.सी.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, शिरपूर) यांचा समावेश आहे. डॉ. उज्वला एम. पाटील (हेड, सी.एस. ई. डी.एस. ए.आय.एम.ल., डीन क्यू.ए., आर.सी.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, शिरपूर) या कॉन्फरन्स चेअर म्हणून कार्यरत असतील.

या कॉन्फरन्स द्वारे विद्यार्थी, स्टाफ, संशोधक आपल्या विषयाशी संबंधित संशोधनावर आधारित पेपर सादर करतील. संशोधनाची ही व्यासपीठ विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्रात नवीन दृष्टिकोन विकसित करण्याची आणि इतर तज्ञांशी संवाद साधण्याची संधी प्रदान करेल. संस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांनी विद्यार्थी, शिक्षक व संशोधकांनी या कॉन्फरन्समध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विकास कामांचे आज भूमिपूजन

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विविध विकास कामांचे आज भूमिपूजन व नवनिर्वाचित आमदारांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

शनिवार, दि.१८ जानेवारी रोजी नंदुरबार येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या म.ज्योतिबा फुले भाजीपाला मार्केट यार्डातील लिलाव शेडचे भूमिपूजन आ. राजेश पाडवी, मुख्य बाजार आवारात डांबरीकरण व ओटे बांधकामाचे भूमिपूजन आ. शिरीषकुमार नाईक, कल्याणी पेट्रोल पंप जवळील शॉपिंग सेंटरसह गोडाऊनचे भूमिपूजन आ.आमश्या पाडवी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी शिवसेना शिंदे गटाचे संपर्कप्रमुख तथा माजी आ.चंद्रकांत रघुवंशी तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड.राम रघुवंशी, शहादा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील, जि.प. माजी अध्यक्ष वकील पाटील, जि.प.माजी अध्यक्ष भरत गावित, जि.प.माजी उपाध्यक्ष जयपालसिंह रावल, जि.प.माजी सदस्य विजयसिंह पराडके, पं.स.माजी सभापती अंजना वसावे, सामाजिक कार्यकर्ते इंजि.किरण तडवी, माजी सभापती विक्रमसिंह वळवी, शेतकी संघाचे अध्यक्ष बी.के पाटील, जि.प.माजी सदस्य देवमन पवार, शिवसेना तालुकाप्रमुख डॉ.सयाजीराव मोरे, पं.स माजी उपसभापती छाया पवार, भाजीपाला असोसिएशनचे अध्यक्ष विजय माळी उपस्थित राहणार आहेत. नवनिर्वाचित आ.राजेश पाडवी, आ.आमश्या पाडवी, आ.शिरीषकुमार नाईक यांचा सत्कार संजय टाऊन हॉल येथे करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन बाजार समिती सभापती संध्या पाटील, उपसभापती गोपीचंद पवार यांच्यासह सर्व संचालक मंडळाने केले आहे.

## पाच दुकानदारांसह दोघांनी चौसष्ट मोबाईल विकले

(पान १ वरून) खुशाल सोनार याचेकडून ४१ हजाराचा ओप्पो मोबाईल, चार्जर तसेच त्याचे, त्याच्या आईचे व वडिलांचे बँक पुस्तके जप्त केल्याचे सांगितले. आरोपींना पोलीस कोठडी का मिळावी यासाठी तब्बल तेरा मुद्दे न्यायालयापुढे मांडले. आरोपींनी अपहार केलेले मोबाईल ज्यांच्या मदतीने विकले त्यामध्ये सात जणांची नावे आपल्या रिमांड रिपोर्टमध्ये दिली आहेत. यामध्ये जियाउद्दीन शेख (दुकान नाही) एकूण ३० मोबाईल, सिद्धी मार्केटींग मोबाईल (पप्पनशेठ) २ मोबाईल, रॉयल मोबाईल ५ मोबाईल, गोल्डन शॉप (गिरीश शेठ) ७ मोबाईल, बाबा मोबाईल (सुमित) १५ मोबाईल, सेवन स्टार एक्का (नंदकिशोर ठाकरे) ४ मोबाईल, खुशाल रविंद्र सोनार १ मोबाईल विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून ते जप्त करण्यासाठी आरोपी नं.१ ची आवश्यकता असल्याचे न्यायालयास रिमांड रिपोर्टद्वारे सांगितले. आरोपी नं.१ ने मोबाईल विक्रीतून मिळालेले पैसे शेअर मार्केटमध्ये गुंतवले असल्याने त्याच्या तपासासाठी तसेच एकापेक्षा अधिक डिमॅट अकौन्टस् उघडले असल्याने सात दिवसाची पोलीस कोठडी मागितली. सहाय्यक सरकारी वकील कविता जगपती यांनी गुन्ह्यातील आरोपींना गुन्हा करतांना कोणी कोणी सहकार्य केले. गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. या सगळ्याचा शोध घेण्यासाठी पोलीस कोठडीची मागणी केली.

फसवणूक झालेल्यांच्यावतीने ॲड.चैतन्य भंडारी यांनी किमंती मोबाईलची कशा प्रकारे विल्हेवाट लावली व कोणत्या लोकांना विकले याचा शोध घेणे आवश्यक आहे. मोबाईल दुकानदारांचा व फायनान्स कंपन्यांचा कोणकोणत्या प्रकारे ह्या गुन्ह्यात सहभाग आहे हे शोधायचे असल्याने पोलीस कोठडीची मागणी केली. यावेळी आरोपींच्या वकीलांनी आपली बाजू मांडतांना पोलीस कोठडी देण्यास विरोध केला. न्यायालयाने दोघा आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करत २० जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

**सी.सी.टीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज जप्त**

सि.सि.टीव्ही कॅमेऱ्यांचे फूटेज आज काही दुकानात जावून एलसीबीने जप्त केले आहे. गेल्या काही महिन्यातील या फूटेजच्या आधारे अनेक मुद्दे स्पष्ट होणार आहेत.

**पावती पुस्तके ताब्यात घेणे आवश्यक**

ज्या गरिबांची फसवणूक झाली आहे, त्यांना मोबाईल दुकानदारांनी कोणत्याही पावत्या दिल्या नसल्याचे सांगण्यात येत आहे. मोबाईल दुकानदारांना हे सर्व मोबाईल फायनान्सचे असल्याने पावत्या फाडणे आवश्यक आहे. यावर ज्याला मोबाईल विकण्यात आला त्यांच्या सह्या घेणे व नक्की मोबाईल घेणारी तीच व्यक्ती आहे ना? याची तपासणी करुन पॅन नंबर व आधार नंबर टाकणे आवश्यक आहे. फसवणुकीतील हे मोबाईल महागडे असल्याने कापलेल्या जी.एस.टी.ची रक्कम नमूद करणे आवश्यक आहे. मात्र दुकानदारांनी फसवणूक झालेल्यांच्या सह्या पावत्यांवर घेतल्या नसल्याचे पिडीतांकडून सांगण्यात येते. यामुळे मोबाईल विक्रेत्यांचे पावती पुस्तक ताब्यात घेणे आवश्यक आहे.

**काही फोन परत मिळाले**

एलसीबीने कमी किंमतीमध्ये विक्री करण्यात आलेले तीन किंमती मोबाईल मिळवले आहेत. यामध्ये दोन पिंपळनेर येथून तर एक शिरपूरमधून ताब्यात घेतला आहे.

**प्रसाद चौधरीला अटक**

फायनान्स कंपनीचा प्रतिनिधी प्रसाद सज्जन चौधरी यास एलसीबीने पुण्याहून धुळ्यात येताच ताब्यात घेतले आहे. गेली दोन दिवस त्याचे लोकेशन पुण्यात होते. उद्या त्याला न्यायालयात हजर केले जाण्याची शक्यता आहे.

## महापालिका हायस्कूलचे हॅकेथॉन प्रदर्शनात सुयश

**धुळे,-नवीन शैक्षणिक धोरण २०-२० अंतर्गत मनपा स्तरावर झालेल्या हॅकेथॉन प्रदर्शनात एकुण ४८ शाळांपैकी धुळे महानगरपालिका हायस्कुलची जिल्हास्तरावर निवड झाली आहे.**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे येथील प्रदर्शनात मनपा हायस्कूल येथील शिक्षक चंद्रकांत गोकुळ गुरव यांनी उर्जा या समस्येवर उपाय म्हणुन प्रतिकृती बनवली. ही प्रतिकृती बनवण्यासाठी शाळेतील विद्यार्थी उमर फिरोज शेख, अर्षद जावेद शेख, उमेद आरीफ पिंजारी या विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून प्रदर्शनात माहिती दिली. या निवडीबद्दल शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी विश्वंभर दासरवाड, मुख्याध्यापक रूपेश कुलकर्णी, शिक्षिका रोकडे, बेहेरे व वैशाली बेहरे, चंद्रकांत चौधरी,नितीन गुळवे, उमेश आव्हाड, चेतन मोरे, यांनी चंद्रकांत गुरव यांचे अभिनंदन केले आहे.


प्रकाश में आज **औलाद**




**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY NAME FROM **MARYAM BI AHMAD ALI** TO **MARIYAM BI ANIS SHAH**
**ADD- 26, FRONT OF ARIHANT BHAVAN, GAJANAN COLONY, DHULE-424001**












# माझी जगावयाची न्यारीच रीत आहे, पोटात भूक माझ्या, ओठात गीत आहे



**नंदुरबार, दि. १७ (प्रतिनिधी) - मकर संक्रांतीचा सण. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पतंगांचा गोंगाट, गोडवा वाढवणारा तीळगुळाचा गजर, आनंदोत्सवाची रंगत. परंतु, या सणाच्या जल्लोषापासून स्वतः ला वेगळं ठेऊन नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी मात्र वातानुकूलित दालनाच्या बाहेर पडत, त्या खऱ्या अर्थाने ज्यांनी आपले सर्वस्व सरदार सरोवर प्रकल्पासाठी त्यागले त्यांची संक्रांत शुभ करून गेल्या.**

तळोदा तालुक्यातील मोड पुनर्वसन गावाला भेट देत, त्यांनी गावकऱ्यांच्या समस्यांमध्ये समरस होऊन संवाद साधला. सामान्यांच्या समस्या सोडवायच्या असतील, तर त्यांच्यासोबत त्यांच्या मातीवर पाऊल ठेवायला हवं, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. औपचारिकतेला फाटा देत त्या अंगणात बसल्या, गप्पांचा मोकळा पूल बांधला. त्यांच्या संवादामध्ये केवळ प्रशासकीय सूचना नव्हत्या, तर होती सखोल समज, माणुसकीची ऊब, आणि आश्वासनं नव्हे तर कृतीचे वचन. सोबत असलेले सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर, तहसीलदार दीपक धिवरे, नर्मदा विकास विभागाचे अधिकारी आणि विविध प्रशासकीय विभागांनी देखील त्यांच्या मार्गदर्शनानुसार तत्काळ उपाययोजना सुरू केल्या.पुनर्वसितांच्या भेटीनंतर, तळोदा तहसील कार्यालयात १०० दिवसीय कृती आराखड्याचा आढावा घेत, सर्व यंत्रणांना काटेकोरपणे काम करण्याच्या सूचना दिल्या. १५ एप्रिल २०२५ पर्यंत प्रत्येक कृती प्रभावी व्हायला हवी, असे स्पष्ट करत त्यांनी प्रत्येकाला आपल्या कर्तव्यात सचोटी राखण्यासाठी प्रोत्साहित केले. यावरच न थांबता, त्यांनी तळोदा नगर परिषदेला भेट देऊन तेथील कामांचाही आढावा घेतला. आज, ज्या ठिकाणी बहुतेक लोक कुटुंबीयांसोबत सण साजरा करत होते, तिथे डॉ.मित्ताली सेठी मात्र वाड्या-पाड्यांतील वंचितांमध्ये खऱ्या अर्थाने सण साजरा करत होत्या. त्यांच्या भेटीनं त्या लोकांच्या आयुष्यात संक्रांतीचा गोडवा आणला. त्यांच्या या कार्यातून एक गझल साकारते, जी त्यांच्यावर अगदी समर्पक ठरते-

**माझी जगावयाची**
**न्यारीच रीत आहे,**
**पोटात भूक माझ्या,**
**ओठात गीत आहे!**

# प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिन सोहळ्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी समन्वयाने जबाबदारी पार पाडावी

**धुळे, दि.१७- भारतीय प्रजासत्ताकाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजून १५ मिनिटांनी जिल्हा पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानावर मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम होईल. या पार्श्वभूमीवर सर्व विभागप्रमुखांनी आपल्याला नेमून दिलेली कामे समन्वयाने करीत वेळेत पार पाडावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात भारतीय प्रजासत्ताकाचा ७५ वा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी पूर्व तयारीची बैठक आज जिल्हाधिकारी पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, चंद्रशेखर देशमुख, महादेव खेडकर, गंगाराम तळपाडे, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार, तहसिलदार पंकज पवार, अपर तहसिलदार वैशाली हिंगे, मनपा उपायुक्त शोभा बाविस्कर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.


जिल्हाधिकारी पापळकर म्हणाले, जिल्हा पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानावर मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ९.१५ वाजता होईल. या पार्श्वभूमीवर पोलीस मुख्यालय परिसर संबंधित विभागाने स्वच्छ ठेवावा. मैदानावर मुख्य कार्यक्रम होणार असल्याने मैदानाचे सपाटीकरण, साऊंड सिस्टीम व आवश्यक दुरुस्तीच्या कामाला गती द्यावी. मुख्य शासकीय कार्यक्रमाच्या नियोजनासाठी संबंधित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. प्रजासत्ताक दिनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे. कार्यक्रमाच्या दिवशी आवश्यक पोलीस बँड पथक, पोलीस पथक उपस्थित ठेवावे. पुरस्कार वितरणाची संबंधित विभागाने यादी करावी. शहरातील राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांचा परिसर स्वच्छ ठेवावा. कार्यक्रमस्थळी पिण्याचे पाणी, चहापानाची व्यवस्था करावी. तसेच मुख्य शासकीय समारंभास आलेल्या निमंत्रित तसेच मान्यवरांच्या बसण्याची व्यवस्था करावी.

पोलिस विभागाने प्रांगणात सुरक्षेचे नियोजन करावे. श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने ध्वजवंदन कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रथमोपचारासह सर्व साहित्य, आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. शिक्षण विभागाने मुख्य शासकीय समारंभाकरीता सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करीत त्याचा नियमितपणे सराव करून घ्यावा. त्याचप्रमाणे मुख्य शासकीय समारंभ कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, जिल्हा गौरव व हुतात्मा स्मारक समिती सदस्य, दलित मित्र पुरस्कार प्राप्त व्यक्ती, स्थानिक राजकीय पक्षाचे प्रमुख, पत्रकार, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शासकीय, निमशासकीय कार्यालयांचे प्रमुखांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गावंडे यांनीही मार्गदर्शक सुचना केल्या.

# मूकबधिर स्पोर्टस् चॅम्पियनशिप स्पर्धेत धुळे जिल्हा संघाचे सुयश

**धुळे, दि.१७- ओमकार कर्णबधिर विकास संस्था डोंबीवलीतर्फे आयोजित १४ व्या महाराष्ट्र मूकबधिर स्पोर्टस् चॅम्पियनशिप आणि तिसरे मूकबधिर ज्युनियर व सबज्युनियर चॅम्पियनशिप स्पर्धा नुकत्याच ठाणे येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये धुळे जिल्हा मूकबधिर संघाने उल्लेखनीय कामगिरी करत एक सुवर्ण तर एक कांस्य पदक मिळवले आहे. कु.वैष्णवी बाला मोरे हिने ज्युडो ७० किलो वजनी गटात सुवर्ण पदक तर भुषण गुलाब महाले याने ५७ किलो वजनी फ्री स्टाईल गटात कांस्य पदक जिंकले.**

या यशस्वी प्रयत्नामागे खेळाडूंच्या व्यतिरिक्त प्रशिक्षक प्रशांत मोरे आणि संघटनेचे अध्यक्ष निलेश मोरे, उपाध्यक्ष गुलाम अन्सारी, सचिव मयुर बोरसे, सहसचिव रविंद्र चुरेटे, खजिनदार गुरूदास कोठावदे, सदस्य सोहेल तेली, मनेश पाटील, शाहिद खाटीक, संजय पाटील, हिना कौसर अन्सारी, तब्बसुम शेख यांनी मोलाचे योगदान दिले. स्पर्धेतील धुळे जिल्ह्याच्या यशाने जिल्ह्यातील इतर मूकबधिर खेळाडूंनाही प्रेरणा मिळाली आहे. आशा आहे की, भविष्यातही धुळे जिल्हा संघ अशाच प्रकारे उत्कृष्ट कामगिरी करत राहील असे संघटनेचे सचिव मयुर बोरसे यांनी सांगितले.




# प्रभाग नऊ मधील शौचालयांची दुरावस्था

धुळे, दि.१७- शहरातील प्रभाग नं.९ मधील नदी किनारी पांझरेश्वर मंदीरा जवळ शौचालयाची दुर्दशा झालेली असून त्यात पुरुषांचे दहा व स्त्रियांचे दहा शौचालय आहेत. परंतू बऱ्याच दिवसांपासून शौचालयास दरवाजे नाही. पाण्याचे नळ तुटलेले आहे. शौचालयाचे भांडे फुटलेले आहे. लाईट बंद परिस्थितीत आहे. तसेच बोअरींग बंद पडलेली आहे. शौचालय रोज साफ होत नाही. पंधरा दिवसांच्या आत शौचालय व्यवस्थित दुरूस्ती करून न झाल्यास प्रभाग नं.९ मधील स्त्रिया व पुरुष पालिकेवर मोर्चा काढतील, असा इशारा देण्यात आला आहे. यावर मनपा आयुक्त अनिता दगडे पाटील यांनी आरोग्य विभागाचे उपायुक्त निकम यांना सदर दुरुस्ती तातडीने करण्याचे निर्देश दिले आहेत.

# शिरपुरात गोवंशाची ५६० कातडी जप्त

**शिरपूर दि.१७ (का.प्र.)- धुळे येथील एलसीबी आणि शिरपूर शहर पोलिसांनी १६ जानेवारीला रात्री संयुक्त कारवाई करीत शहरातील मोम्हमदिया चौकामधील घरातून गोवंशाची ५६० कातडी जप्त केली. घटनास्थळावरुन एकाला अटक करण्यात आली.**

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एलसीबीचे निरीक्षक श्रीराम पवार यांना शिरपूर शहरात गोवंश कातडी अवैधरित्या एकाने ताब्यात बाळगल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक के.के.पाटील व सहकाऱ्यांसोबत खाटीक गल्लीतील मोहम्मदिया चौकात सईद अहमद रज्जाक खाटीक (वय ४९) याच्या घरावर छापा टाकला.

त्याच्या घराशेजारी आरसीसी बांधकाम असलेल्या इमारतीमधून गोवंशाची ५६० कातडी जप्त करण्यात आली. त्याची किंमत ५६ हजार रुपये आहे. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक श्रीराम पवार, निरीक्षक के.के.पाटील, सहायक निरीक्षक हेमंत पाटील, हवालदार रोकडे, चंदन सोनार, अनिल सोनार, सचिन वाघ, योगेश दाभाडे, गोविंद कोळी, रवींद्र आखडमल, प्रशांत पवार, आरिफ पठाण, मयूर पाटील, योगेश जगताप यांनी ही कारवाई केली.

# स्वामीत्व योजनेतंर्गत सनद वाटप होणार

(पान ४ वरुन) गावातील ग्रामविकास अधिकारी यांनी उपस्थित राहून सनद वाटप कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख स्वाती लोंढे यांनी केले आहे.

या गावात होईल सनद वाटप

धुळे तालुक्यातील सातरणे, जुन्नेर, निमखेडी, सिताणे, नंदाळे खु, वणी खु,., साक्री तालुक्यात कुरुसवाडे, नवडणे, शेवाळी मा., वरझडी, सतमाणे, शिंदखेडा तालुक्यात चौगाव खु, वसमाने, वरझडी, तसेच शिरपूर तालुक्यात अहिल्यापूर, पिंप्री, असली, आढे तसेच उप्परपिंड या गावात सनद वाटपाचा कार्यकम होणार आहे.

## जाहीर नोटीस

अ‍ॅड.आर.ए.जगताप
नि. १३३

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. सि. डी. यांचे कोर्टात**

रे.मु.नं. ४७/२०१३

**वत्सलाबाई तुकाराम वगैरे** .... वादी

।।विरूध्द।।

**मोहनलाल शालीग्राम वगैरे** .... प्रतिवादी

या दाव्यातील मयत प्र. वादी नं. १ चे वारसदार

**१-अ) सौ. ललीता गिरिष अग्रवाल, १-ब) सौ.सरिता सुमोद गोयंका**

**१-क) सौ. सुनीता दिपक डागा, १-ड) सौ. संगीता राजेंद्र केडीया**

सर्व मुळ राहणार – जुना इंडियन ऑईल डेपो समोर, स्टेशन रोड, धुळे ता. जि. धुळे यांना कळविण्यात येते की, ज्या अर्थी वादी यांनी तुमच्या सर्वांच्या विरुद्ध धुळे दिवाणी न्यायालयात दावा दाखल करुन प्रलंबित असलेल्या दाव्यात तुम्हास नोटीसीची बजावणी होऊनही वारसदार म्हणून तुम्ही अगर तुमचे तर्फे प्रतिनिधी हजर झालेले नाही त्या अनुषंगाने या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद दाव्यात दि. २१/०२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर पूर्ण माहिती असलेल्या दिलेल्या कायदेशीर प्रतिनिधी मार्फत हजर व्हावे. आणि तुमचे म्हणणे द्यावे. नमूद तारखेस दाव्यात तुम्ही अगर कोणीही हजर न राहिल्यास तुमच्या विरोधात योग्य ते एकतर्फा चौकशी हुकूम केले जातील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. १७/०१/२०२५ — आदेशावरुन
सही... — सही...
**कनिष्ठ कारकुन** — (कोर्टाचा शिक्का) — **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे — दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे नगांव बु. ता. जि. धुळे येथील गट नं. २१२/१/अ चे एकूण क्षेत्र ला. ला. १ हे. ४९ आर.+पो. ख. ० हे. १२ आर. एकूण १ हे. ६१ आर. आकार ८ रु. ४४ पैसे जिरायत शेतजमीन, वापर व रस्ता वहिवाटीप्रमाणे, भोगवटा वर्ग १. **यासी चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे.**

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे आशिल यांनी मिळकतीचे मालक हिंमत दिपा पाटील रा. नगांव बु. ता.जि. धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेलाआहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती,खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १७/०१/२०२५

**अ‍ॅड. रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.
**मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की ७/१२ उताऱ्या प्रमाणे वर्णन- मौजे धुळे येथील स.नं.५७५/१ यापैकी प्लॉट नं.२९ एकूण क्षेत्र ६२७ चौ.मी. बखळ प्लॉट सि.स.उताऱ्या प्रमाणे वर्णन- मौजे धुळे येथील विस्तारीत सि.स.नं.१७४ एकूण क्षेत्र ६३१ चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु: **सिमा दिशा चतु: सिमा**

पुर्वेस- १० फुट रुंदीची बोळ व पुढे प्लॉट नं.३०, पश्चिमेस- ३० फुट रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं.३२, उत्तरेस- १०० फुट रुंदीचा डी.पी. रोड.

येणे प्रमाणे वर्णनाची आतील बखळ प्लॉट १.श्री.महेश सुरेशचंद्र काबरा रा.१४, व्दारका कुंज, वल्लभ नगर, मालेगांव रोड, धुळे, २.श्री.किशोर सखाराम सोनार रा.७४, लक्ष्मी नगर, आयटीआय कॉलेज मागे, देवपूर, धुळे ३.श्री.राजेंद्र स्वरुपचंद छाजेड रा.५/अ, अमोल सोसायटी, वाखारकर नगर जवळ, धुळे ४.श्री.संजय रघुनाथ अहिरराव रा.३६, क्षिरे कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे ५.पियुष लाईफस्पेस प्रा.लि.तर्फे संचालय श्री.संजय सदाशिव देसले रा.तळ मजला, सदाफुली अपार्टमेंट, साक्री रोड, धुळे यांचे सामाईक मालकीचा व ताबे उपभोगातील आहे.

आमचे अशिल यांच्याशी सदर बखळ प्लॉटचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर बखळ प्लॉटच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर बखळ प्लॉटवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत खालील पत्यावर बखळ प्लॉट संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची बखळ प्लॉट निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल, तद्नंतर आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. **ठिकाण- धुळे, दिनांक-१७/०१/२०२५.**

**अ‍ॅड.चेतन महादु यादव**
पत्ता- सि.स.नं.२५९७/अ, श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५,
मिरच्या मारुती चौक, धुळे-४२४००१. **मो.नं.९६८९१२४६९२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे न्याहळोद ता. जि. धुळे येथील शेत गट नं. ५०७/२/अ चे एकूण क्षेत्र ला. ला. ०० हे. ९४ आर. आकार रु. ४.७५ पैसे या पैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र ला. ला. ०० हे. ४७ आर. आकार रु. २.३८ पैसे यांसी चतु:सिमा पुर्वेस गट नं. ५०७/२/ब/२, पश्चिमेस : गट नं. ५०७/२/अ पैकी भाग, दक्षिणेस : गट नं. १९५/१/अ/१, उत्तरेस : गट नं. ५०५ येणे प्रमाणे वर्णनाची शेत मिळकत **श्री. सुनिल महादू माळी** रा. न्याहळोद ता. जि. धुळे. यांचे मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यांनी नमूद शेजजमीन/मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. सदरहू मिळकतीच्या सात बारा उताऱ्यावर इतर हक्कात कॅनरा बँक, शाखा न्याहळेद ता. जि. धुळे चा बोजा नमूद आहे. या व्यतिरिक्त सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था. बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, हितसंबंध देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधी योग्य ते कागदपत्रानिशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकती पूर्णपणे निवेंध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे. असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्याचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी, तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दि. १७/०१/२०२५

**अ‍ॅड.विजय म.मोरे**
नोटरी –भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी,
धुळे **मो. नं. ९८२२८५२६५०.**

## जाहीर नोटीस

तमाम जनता, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था इत्यादी यांना जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे रामी ता. धुळे जि. धुळे येथील गट नं. २३२/१/ब चे ला. ला. क्षेत्र ० हे. ९० आर. पो. ख. ० हे. ०२ आर. एकूण क्षेत्र ० हे. ९२ आर. आकार रु. ०२ रु. ०.५० पैसे येणे प्रमाणे शेत जमीन असून यासी चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे येणे प्रमाणे शेत जमीन १) अशोक बापू माळी रा. रामी ता. जि. धुळे २) हिरालाल बापू माळी रा. मु. पो. जैताणे पोस्ट निजामपूर ता. साक्री जि. धुळे, ३) सुरेखा राजुभाई माळी रा. सुरत यांचे मालकीचे व कब्जे उपभोगातील असून आमचे अशिल कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे. बयाणा रक्कम अदा केलेली आहे. सदर शेत जमीनीवर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा बोरीस या बँकेचा बोजा असून तरी या व्यतिरिक्त वरील शेत जमीन संबंधी कोणाची खरेदी, विक्री, गहान, बक्षिस, टांच, जप्ती, राष्ट्रीयकृत बँक बोजा, पतसंस्था बोजा, को.ऑप बँक बोजा, वारसा हक्क, वहिवाट हक्क, वाटणी हक्क, जनरल मुखत्यारपत्र, अधिकार, सौदा पावती वरील सौदा पावती, करारनामा वगैरे इतर कुठलेही हस्तांतरीत व्यवहार असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ (८) दिवसांचे आत मुळ साक्षांकित स्वरुपातील लेखी तक्रार खालील दिलेल्या पत्त्यावर कळविण्यात याव्यात. तसेच प्रत्यक्ष मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशिलांची खात्री करुन द्यावी. मोबाईल द्वारे, पोस्टाने अथवा परस्पर वर्तमानपत्राद्वारे घेण्यात येणाऱ्या हरकती अथवा तक्रारी आमच्या अशिलांवर तसेच वरील वरील शेत जमीन वर बंधनकारक राहणार नाही.

येणेप्रमाणे पक्षकाराने दिलेल्या माहितीनुसार आमचे मार्फत जाहीर नोटीस असे. धुळे दि. १७/०१/२०२५

**अ‍ॅड. अमित अशोक वाघ**
२२, श्रीराम वाटीका, मधुबन कॉलनी,
वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे
**मो. नं. ९८२३१३६००७**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भोकर ता. जि. धुळे येथील गट नं. २०४/२/अ पैकी प्लॉट नं. ३८ चे क्षेत्र ८० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ३१, दक्षिणेस : प्लॉट नं. ३९, उत्तरेस : प्लॉट नं. ३७. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकती **श्री.जितेंद्र हरिश्चंद्र चौधरी** रा. वलवाडी ता. जि. धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/ घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, वगैरे असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक : १७/०१/२०२५

**अ‍ॅड.विजय म.मोरे**
नोटरी –भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी,
धुळे **मो. नं. ९८२२८५२६५०.**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हित संबंधितांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. धिरसिंग रामअभिलाषसिंग ठाकूर आणि सुरेंद्रसिंग रामअभिलाषसिंग ठाकूर रा. धुळे यांच्याशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदे करार केलेला असून लवकरच सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे. सदर मिळकतीच्या टायटल व्हेरिफिकेशन हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वगैरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबद्दल स्वत:च्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजित मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे. असे समजून सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

परिशिष्ट :- मौजे रानमळा ता. जि. धुळे येथील.

1. गट नं. १२४/२/ब चे एकूण क्षेत्र ला. ला. ०० हे. ६० आर + पो. ख. ०.०० आर असे एकूण क्षेत्र ०० हे. ६० आर यासी आकार रु. ०.९१ पैसे मात्रची असलेली शेत जमीन मिळकत, यासी चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे व वहीवाटीप्रमाणे असे.
2. गट नं. १२२/१/ब चे एकूण क्षेत्र ला. ला. ०० हे. ४० आर + पो. ख. ०.०० आर असे एकूण क्षेत्र ०० हे. ४० आर यासी आकार रु. १.४० पैसे मात्रची असलेली शेत जमीन मिळकत, यासी चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे व वहीवाटीप्रमाणे असे.
3. गट नं. १२२/२ चे एकूण क्षेत्र ला. ला. १ हे. ३० आर + पो. ख. ०.०० आर असे एकूण क्षेत्र १ हे. ३० आर यासी आकार रु. ४.२५ पैसे मात्रची असलेली शेत जमीन मिळकत, यासी चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे व वहीवाटीप्रमाणे असे.
4. गट नं. १२२/३ चे एकूण क्षेत्र ला. ला. ० हे. ८० आर + पो. ख. ०.०० आर असे एकूण क्षेत्र ० हे. ८० आर यासी आकार रु. २.५० पैसे मात्रची असलेली शेत जमीन मिळकत, यासी चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे व वहीवाटीप्रमाणे असे.

सदर जाहीर नोटीस आशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि. १७/०१/२०२५

**अ‍ॅड.शैलेश मदनलाल पंसारीया**
५, दिघे अ‍ॅडव्होकेट चेंबर्स, धुळे जिल्हा कोर्टासमोर, स्टेशनरोड, धुळे ४२४००१
**मो.नं.९७६६२५५७७९, ९१७२१८१७७७**

## जाहीर नोटीस

**शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

फौजदारी कि.अर्ज नं.९४६/२०२४

**श्रीमती.भारती संतोष ठाकरे,** वर्षे, धंदा- ,
रा.लक्कडकोट, ता.शहादा, जि.नंदुरबार. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

जन्म मृत्यू निबंधक अधिकारी लक्कडकोट
ग्रामपंचायत लक्कडकोट, ता.शहादा, जि.नंदुरबार. ..... **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार भारती संतोष ठाकरे यांचा जन्म दि.०१/०२/२००२ रोजी मौजे.लक्कडकोट, ता.शहादा जि.नंदुरबार येथे झाला असल्याने अर्जदाराने दि.११/०८/२०२३ रोजी चा जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम २०२३ चे कलम ११(३) अन्वये प्रमाणे जन्म दाखला मिळणेसाठी शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो.शहादा यांचे न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जा संदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.२१/०१/२०२५ रोजी किंवा १५ दिवसांचे आत दुपारी ०२.३० वाजता स्वत:अगर वकिलांमार्फत शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो.शहादा यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ती स्वत:अगर आपल्या वकिलामार्फत हजर न झाल्यास सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २/१/२०२५ रोजी माझे सहीनिशी व शिक्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

आदेशावरून
(कोर्टाचा शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार शहादा**

## NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **PINJARI SURAYYA LALA** TO **SURAIYYA BI ABDULNABI PINJARI**
ADD- AGRA ROAD, DURGA MATA MANDIR JAVAL, VITABHATTI, DEOPUR, DHULE-424002

## NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **SHAIKH NASEEM ABDUL MUNAF** TO **NASEEM BANO KALEEM AHAMED SHAIKH**
ADD- H.NO.13, AGRA ROAD, MOHAMMADI NAGAR, NEAR MOHAMMADI MASJID, DEOPUR, DHULE-424002

## जाहीर नोटीस

**शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

फौजदारी कि.अर्ज नं.१३२३/२०२४

**श्री.शिवया गोरा वळवी,** वर्षे, धंदा- मजुरी,
रा.केवडीपाणी, ता.शहादा, जि.नंदुरबार. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

जन्म मृत्यू निबंधक अधिकारी
कन्साई, ता.शहादा, जि.नंदुरबार. ..... **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांचा भाऊ दिवान गोरा वळवी यांचा जन्म दि.२६/०१/२०१० रोजी मौजे.केवडीपाणी, ता.शहादा जि.नंदुरबार येथे झाला असल्याने अर्जदाराने दि.११/०८/२०२३ रोजी चा जन्म नोंदणी सुधारणा अधिनियम २०२३ चे कलम ११(३) अन्वये प्रमाणे जन्म-मृत्यू दाखला मिळणेसाठी शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो.शहादा यांचे न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जा संदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.२७/१/२०२५ रोजी किंवा १५ दिवसांचे आत दुपारी ०२.३० वाजता स्वत:अगर वकिलांमार्फत शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो.शहादा यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ती स्वत:अगर आपल्या वकिलामार्फत हजर न झाल्यास सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ९/१/२०२५ रोजी माझे सहीनिशी व शिक्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

आदेशावरून
(कोर्टाचा शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार शहादा**

## जाहीर नोटीस

**शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

फौजदारी कि.अर्ज नं.९६२/२०२४

**श्रीमती.सेनी पेवा पाडवी,** वर्षे, धंदा- ,
रा.खडक्या, ता.अक्राणी, जि.नंदुरबार. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

जन्म मृत्यू निबंधक अधिकारी कन्साई
ग्रामपंचायत कन्साई, ता.शहादा, जि.नंदुरबार. ..... **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार सेनी पेवा पाडवी यांचा जन्म दि.१०/०३/१९८८ रोजी मौजे.केवडीपाणी (कन्साई), ता.शहादा जि.नंदुरबार येथे झाला असल्याने अर्जदाराने दि.११/०८/२०२३ रोजी चा जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम २०२३ चे कलम ११(३) अन्वये प्रमाणे जन्म-मृत्यू दाखला मिळणेसाठी शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो.शहादा यांचे न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जा संदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.१०/०१/२०२५ रोजी किंवा १५ दिवसांचे आत दुपारी ०२.३० वाजता स्वत:अगर वकिलांमार्फत शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो.शहादा यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ती स्वत:अगर आपल्या वकिलामार्फत हजर न झाल्यास सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/१२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व शिक्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

आदेशावरून
(कोर्टाचा शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार शहादा**

## जाहीर नोटीस

प्रति,

एच.डी.एफ.सी. बँक लि., नंदुरबार

तमाम लोकांना तसेच वित्त संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहिदा त.श, ता.शहादा, जि.नंदुरबार येथील सर्वे नं.५५१, मधील प्लॉट नं.९अ क्षेत्र ११७-०० चौ.मी. बांधीव घराची मिळकत श्रीमती प्रतिभा अंकुश पाटील रा.शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार यांचे प्रत्यक्ष मालकीची व कब्जेउपभोगातील आहे. सदर मिळकत श्री.राजा राजेंद्रप्रसाद जयस्वाल, रा.दत्त कॉलनी, शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार यांनी खरेदी करण्याचा सौदा श्रीमती प्रतिभा अंकुश पाटील यांचेजवळ केलेला असून लवकरच सदर मिळकतीचा रजि. खरेदीखत लिहून नोंदवून घेवून खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहे. सदर मिळकतीवर खरेदी करण्यापूर्वी कोणाचेही हक्क अधिकार अगर हितसंबंध, दान, बक्षीस तसेच सौदा, ताबेगहाण, मालकी हक्क, भाडेपट्टा, लिज, बोजा, वारस हक्क, वाटणी हक्क, अधिकार आहे किंवा नाही याची खातरजमा करुन घेणे आवश्यक आहे. म्हणून या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आंत सदर मिळकतीबाबत कोणाचे हक्क, अधिकार, हिस्सा अगर कब्जा असल्यास वर नमूद पत्त्यावर योग्य ते कागदात्र व लेखी पुराव्यासह म्हणणे सादर करावे तसेच जाहीर हरकत विचारात घेतली जाणार नाही. वर दिलेल्या मुदतीत कोणी काहीही, हक्क, अधिकार, दावा दाखविला नाही अगर केला नाही तर आमचे अशिल हे रजि. खरेदीखतान्वये सदर मिळकत खरेदी करतील त्यानंतर कोणतीही सबब ऐकली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदर नोटीस श्री.राजा राजेंद्रप्रसाद जयस्वाल, रा.दत्त कॉलनी, शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार यांच्या सांगण्यावरुन प्रसिध्द करण्यात आली.

**दिनांक-१७/०१/२०२५.**

**अ‍ॅड.डी.एस.पटेल,** अ‍ॅडव्होकेट व नोटरी,
४५, कल्पनानगर, शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार.
**मो.नं.९४२२४१६५९८**

## जाहीर नोटीस

प्रति,

एच.डी.एफ.सी. बँक लि., नंदुरबार

तमाम लोकांना तसेच वित्त संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कुकडेल, ता.शहादा, जि.नंदुरबार येथील सर्वे नं.६६, मधील प्लॉट नं.२६ क्षेत्र १५२.५० चौ.मी. ही मिळकत रविंद्र भिमसिंग गिरासे, रा.शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार यांनी अनिल भाईदास पाटील, रा.शहादा ता.शहादा, जि.नंदुरबार यांचेकडून दिनांक २०/०३/२०१२ रोजीचा खरेदीखत दस्त क्र.१३२५/२०१२ अन्वये खरेदी केली होती. सदरहू मिळकत आज रोजी श्रावण आनंदा साठे यांचे नावाने असून त्यांचेकडून घर बदलीच्य वेळी करतांना गहाळ झाले आहे.

तरी वर नमूद मुळ खरेदी खत व सुची क्र.२ चे व एस.आर.आर. पावती कोणासही कोठेही आढळल्यास ३ दिवसात वर नमूद पत्त्यावर पोहोचविण्याचे करावे. कळावे

ही नोटीस होय. सदरची नोटीस श्रावण आनंदा साठे यांचे सांगणेवरुन प्रसिध्द करण्यात आली आहे.

**दिनांक-१७/०१/२०२५.**

**अ‍ॅड.डी.एस.पटेल,** अ‍ॅडव्होकेट व नोटरी,
४५, कल्पनानगर, शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार.
**मो.नं.९४२२४१६५९८**

पान १ वरुन

## भावंडांच्या हत्याकांडाने हादरला

रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन सुरू आहे. अंभोरा पोलीस ठाण्याचे अधिकारी, स्थानिक प्रशासन आणि गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी या प्रकरणाचा तपशीलवार तपास करत आहेत. दरम्यान जिल्ह्यांत वारंवार घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

## कराड दिंडोरीतील आश्रमात होता!

आहेत आणि या मागे दिंडोरीच्या आश्रमाचे प्रमुख आण्णासाहेब मोरे ऊर्फ गरुमाऊली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. इतकंच नाहीतर त्यांनी पुरावे असल्याचेही म्हटले आहे. बीड हत्या प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड हे दोन दिवस दिंडोरीतील आश्रमात मुक्कामाला होते, असा दावा देसाईंनी केला. मगाच्या वर्षी आश्रमात जे काही चुकीचे प्रकार घडत होते, त्या प्रकरणात वाल्मिक कराड याने मध्यस्थी केली, त्याचेच उपकार फेडण्यासाठी त्याला आश्रमात अश्रय देण्यात आला, असा आरोपही तृप्ती देसाई यांनी केला आहे. यावर आबासाहेब मोरे यांनी उत्तर दिले आहे. त्यांनी जो कालावधी सांगितला, त्या कालावधीत इथ दत्तजयंती सप्ताह सुरू होता, या काळात इथे लाखो भाविक येतात. ते गर्दीत दर्शनाला येवून गेले. मात्र आम्हाला त्याची कल्पना नाही. सीआयडीची टीम इथ येवून गेली, आम्ही त्यांना आश्रमातील सीसीटीव्ही फुटेज दिले आहे. ते भाविक म्हणून येवून गेले, असे त्यांनी म्हटले.

## रेल्वे स्थानक नुतनीकरणास आर्थिक मंजुरी

व्यवस्थेच्या संदर्भात कांदा, डाळिंब, कापड उत्पादक, सुती कापड व प्लॅस्टिक उद्योग यांच्या वाहतुकीसाठी विशेष सोयी व अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे देखील यावेळी सांगण्यात आले. शेतकऱ्यांचे सध्या रेल्वे प्रशासनाच्या विरोधात आंदोलन सुरु आहे. यात बोरविहीर-धुळे-नरडाणा रेल्वे मार्गावरील सोनगीर, दापोरा, दापोरी, नरडाणा, बोरविहीर, बाळापूर आदी गावांतील शेती, घर, झाड, बाग, पाईप लाईनसह जमीन संपादनास लोक विरोध करत आहेत. शासकीय नियमानुसार सर्वेक्षण करून त्यांच्या समस्या देखील खा.डॉ. बच्छाव यांनी केंद्र शासनाकडे मांडाव्या अशी शेतकऱ्यांची शिष्ट मंडळे खासदारांना भेटून आपले लेखी गाऱ्हाणे मांडले असता हा देखील प्रश्न आजच्या बैठकीत मांडला गेला आहे.

मोहाडी रेल्वे स्थानकाची अवस्था अत्यंत वाईट झाली असल्याने या ठिकाणी लाईटची व्यवस्था, तिकीट बुकिंग, स्वच्छता गृहे, पिण्याचे पाणी, पंखे, रस्त्यांची डागडुजी अशा इतर सुविधा देण्याबरोबरच वैद्यकीय सुविधा आणि स्थानकाच्या बांधकामाबाबत तसेच नविन प्लॅटफॉर्म बांधाणे. अश्या आशयाची निवेदने खा.डॉ.बच्छाव यांना स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्राप्त झाली होती. याचा पाठपुरावा करत मोहाडी रेल्वे स्थानकाला नुतनीकरण कामासाठी केंद्रीय भारतीय रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश कुमार यांनी आर्थिक मंजुरी देण्याकामी आदेशित केले आहे. यावेळी त्यांनी केंद्र सरकारचे, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आणि केंद्रीय भारतीय रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश कुमार यांचे आभार मानले आहेत.

## आंतरराज्यीय टोळी अटकेत

शाखेने पथक संशयितांच्या शोध घेण्यासाठी मध्यप्रदेशकडे रवाना करण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मध्य प्रदेश येथे जावून संशयित सबत प्यारसिंग अनारे, (वय २९, रा.थिलवाणी, पोस्टे पिंप्रापाणी, ता.कुक्षी जि.धार, मध्यप्रदेश) मनसिंग सदनसिंग चव्हाण (वय २१, रा.कुतेठी, पोस्टे नरवाली ता.कुक्षी जि.धार, मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे इतर साथीदारांसह सदरचा गुन्हा केले असल्याची माहिती दिली. सदर ताब्यातील आरोपींनी दिलेल्या माहितीचे आधारे गुन्ह्यातील साथीदार फुलसिंग हरसिंग मंडलोई, रा.सिंगाचोरी, ता.कुक्षी जि.धार, मध्यप्रदेश हा चोरीचा मुद्देमाल विक्री करणेकामी कुक्षी येथे येणार असल्यानी गोपनीय माहिती मिळालेवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने बातमीचे अनुषंगाने सापळा रचुन फुलसिंग हरसिंग मंडलोई, (वय २३, रा.सिंगाचोरी, ता.कुक्षी जि धार, मध्यप्रदेश) तसेच त्याचेसोबत चोरीचा माल घेणारे सोनार राजतलीत सोनी (वय ३०, रा.जोबट, जि.अलिराजपुर, मध्यप्रदेश) हार्दिक कुमार जसवंत भाई सोनी, (वय ३२, रा.गरबडा, ता.गरबडा, जि.दाहोद, गुजरात) यांना ताब्यात घेतले. त्यांनी गुन्ह्याची कबुली देऊन जिल्हयातील नंदुरबार शहर, शहादा, तळोदा येथे चोरी केल्याचे सांगितले.

आरोपींकडून २३,३४,३१० रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात आली असून त्यांना नंदुरबार शहर पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरहू आरोपीतांनी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश राज्यात सुध्दा घरफोडी केल्याची शक्यता आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास नंदूरबार शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमित मनेळ हे करीत आहेत, असे दत्त यांनी सांगितले.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक श्रवण दत्त. एस. अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार, तसेच पोहेकों मुकेश तावते, राकेश मोरे, विशाल नागरे, बापू बागुल, पोना/मोहन इमढेरे, पोशि/अभय राजपुत, विजय धिवरे केली आदी पथकाने केली आहे. नविन वर्षाच्या सुरुवातीला चांगल्या कामगिरीमुळे पोलिसांचे अभिनंदन, जिल्हयातील अन्य घरफोडींचाही तपास यंत्रणेमार्फत करून गुन्हेगारांना ताब्यात घेण्यात येईल, असे श्रवण दत्त एस यांनी सांगितले.

## पोलिसांनी तिघांना ठोकल्या बेड्या

एमएसईडीसीएल के डायरेक्टर मिटींग में बिझी हु, मेरे अंकल सुरत के हॉस्पिटल मे ॲडमिट है, उनका ऑपरेशन होना है, तो आप मुझे आठ लाख रूपये अर्जंट भेज दिजीए। मै आपके पैसे आज शाम तक लौटा दुँगा। असे सांगितल्याने जिजाबराव पाटील यांनी नेट बँकींगच्या माध्यमातून आठ लाख पाठवले. पुन्हा दोन तासांनी पाच लाखांची मागणी करणारा दुसरा फोन आला. त्याने मुंबई दहिसर येथील खाते नंबर दिला. त्यावरही पाच लाख रूपये पाठविण्यात आले. आरोपीने केलेल्या फोनवर संध्याकाळी संपर्क साधला असता उचलला नाही. त्यानंतर कार्यकारी अभियंता जोशी यांच्याकडून चंद्रा यांचा नंबर घेवून संपर्क साधला असता चंद्रा यांनी कोणत्याही पैशांची मागणी केल्याचे नाकारले. यावरून सायबर फसवणुक झाल्याचे समजले. त्यानुसार सायबर पोलीस स्टेशनला अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोनि. सुरेशकुमार घुसर यांच्या सायबर पथकाने चार महिने सातत्याने शोध घेवून गुन्ह्याशी संबंधित आरोपी यशवंत काशिनाथ पाटील, जयशंकर गोपाल गोसाई व विजय शिवहरी शिरसाठ यांना ताब्यात घेवून अटक केली.

ही कारवाई सायबर पोलीस स्टेशनचे पोनि. पोउनि.प्रतिक कोळी, जगदीश खैरनार, खलाणेकर, पोहेकॉ.राजु मोरे, मराठे, तुषार पोतदार या पथकाने केली. आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने अधिक चौकशीसाठी सोमवार दि.२० जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### बँक खात्यांची माहिती देवू नका

सायबर गुन्हेगार सामान्य जनतेतून काही लोकांना आठ ते दहा हजार रूपयांचे अमिष दाखवून बँकेत नवीन खाते उघडण्यासाठी डिपॉझिट रक्कम देतात व खाते उघडल्यानंतर त्या खात्याचे एटीएम त्या खात्याला लिंक असलेले मोबाईल सिमकार्ड त्याचेकडून घेतात व त्या खात्यावर सायबर द्वारे केलेल्या रकमेचा व्यवहार करतात. अशा प्रकारे खातेदार मोठ्या प्रमाणावर सायबर आरोपी होत आहेत. नागरिकांनी स्वत:चे नावाचे सिमकार्ड, बँक खात्याची माहिती, एटीएम कार्ड दुसऱ्या व्यक्तीस देवू नका अथवा तुम्ही सुध्दा आरोपी होवू नका. असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक धिवरेंनी केले आहे.

पान १ वरुन

## इम्रानखानला चौदा वर्षे..

तीन वेगवेगळ्या कारणांमुळे या निकालाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. पीटीआय या वृत्तसंस्थाने यासंबंधी वृत्त दिले आहे. इम्रान खान हे ऑगस्ट २०२३ पासून रावळपिंडी येथील तुरूंगात आहेत. दरम्यान आर्थिक गैरव्यवहाराच्या बाबतीत या खटल्यातील आलेला निकाल हा आतापर्यंतचा सर्वात मोठा निकाल आहे.

## डाव्या कालव्याचे पाणी पोहचले शेतात

पोहचल्या नंतर शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त करत त्यांचे आभार मानले आहे. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष भाजपा प्रा.अरविंद जाधव, माजी जि.प.शंकर खलाने, नगरसेवक नवनाथ भिल, प.स सदस्य अर्जुन गायकवाड, सरपंच अजय माळी, सुपडू आप्पा, कुणाल शिंदे, गुलाब आण्णा, किशोर पाटील, दिनेश पाटील, भिमा पाटील, सुधाकर सैदाणे, उमेश जयस्वाल आदी शेतकरी उपस्थित होते.

## मोबाईलचे कर्ज चढवून फसवणूक

एल.सी.बी.तर्फे आर.ओ.श्रीकृष्ण पारधी उपस्थित होते. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता फसवणूक झालेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी चौकशी यंत्रणा पूर्ण सहकार्य करतील असे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी एल.सी.बी.ला वेगवेगळ्या सूचना मोबाईल फसवणुकीच्या बाबत दिल्या.

## शहरात एक दिवस उशीराने पाणीपुरवठा

प्युअर वॉटर दोन, बाभळे गावासमोर एक, सोनगीर गावाजवळ एक, टोल नाकाजवळ एक तसेच सरवड फाटा मेंढेश्वर महाराज मंदिराजवळ दोन ठिकाणी गळती लागली आहे. तापी पाणी पुरवठा जलवाहिनीवरील या ठिकाणी दुरूस्तीची कामे दि.१८ जानेवारी रोजी करण्यात येणार आहे.

यामुळे संपूर्ण देवपूर परिसर, बडगुजर जलकुंभ, मायक्रो टॉवर जलकुंभ, दसेरा मैदान जलकुंभ, चक्करबर्डी, मोहाडी जलकुंभ, नाटेश्वर जलकुंभ, जामचा मळा, कुमार नगर या जलकुंभावरून एक दिवस उशीराने पाणी पुरवठा होणार आहे. नागरिकांनी सहकार्य करावे. असे आवाहन मनपा पाणी पुरवठा विभागाने केले आहे.

## शिंदखेड्यात पत्रकारावर रेती..

धमकी देत होते की आम्ही भाऊचे माणस आहोत आमचं कोणीच काहीही वाकड करू शकत नाही. व घरातील घरकुल योजनेचे पैसे जबरदस्तीने लुटून नेले. सदर पिडीत जखमी झाल्याने हिरे वैद्यकीय महाविद्यालयात उपचार घेत आहे. त्यामुळे मस्साजोग ता. केज जि.बीडच्या संतोष देशमुख खुनाची पुनरावृत्ती या ठिकाणी घडली आहे व भविष्यात सुध्दा घडू शकते, या घटनेत पिडीत बचावला आहे. हल्लेखोरांवर गुन्हा दाखल करुन संघटीत गुन्हेगारी कायदा अंतर्गत कारवाई करावी. पीडीत परिवारास कायमस्वरुपी पोलीस संरक्षण देण्यात यावे. अशा आशयाचे निवेदन जिल्हा उपाधिक्षक विश्वजीत जाधव यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी माजी प्राचार्य एम.बी. हातेकर, संविधान संरक्षण समितीचे संस्थापक प्रमुख हरिश्चंद्र लोंढे, दिलीप साळवे, ॲड. विशाल साळवे, बबन वानखेडे, पै. कल्याण गरुड, श्रीकृष्ण बेडसे, धनंजय गाळणकर, छोटूलाल मोरे, रामकृष्ण शिंदे, पं.स.सदस्य प्रकाश गायकवाड, सागर मोहिते, समाधान बैसाणे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# थकबाकी न भरल्याने मनपाने शाळा केली सील
## वारंवार नोटीस बजावूनही दुर्लक्ष केल्याने कारवाई

**धुळे, दि.१७-शहरातील साक्री रोड परिसरातील श्रीमती शांताबाई पिंगळे प्राथ, व माध्यमिक शाळेकडे मालमत्ता करापोटी अकरा लाख अठ्ठावीस हजार रूपये थकबाकी आहे. महापालिकेने वारंवार नोटीस बजावली. कारवाईसाठी गेले असता भरणा करण्याचे आश्वासन देवूनही थकबाकी न भरल्याने शाळेच्या मुख्याध्यापकांचे कार्यालय सील करण्यात आले.**



आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी वसुली विभागाला मालमत्ताकर व पाणीपट्टी वसुलीवर लक्ष केंद्रीत करायला लावल्याने वसुली पथकाने नोटीस दिल्यानंतरही करभरणा न करणाऱ्या मालमत्ताधारकांकडून कर वसुलीचा सपाटा लावला आले. कर वसुलीसाठी महापालिकेने एकुण तेरा पथकांची नेमणुक करण्यात आली आहे. साक्री रोडवरील श्रीमती शांताबाई पिंगळे प्राथमिक व माध्यमिक शाळेकडे अकरा लाख अठ्ठावीस हजार थकबाकी आहे. मागील वर्षी मनपाचे वसुली पथक शाळेत गेले होते. त्यावेळी करभरणा करण्याचे आश्वासन दिल्याने कारवाई टळली होती. मोठा कालावधी उलटल्यानंतरही थकबाकी न भरल्याने मनपातील वसुली अधीक्षक मधुकर निकुंभ यांच्यासह चंद्रकांत उगले, मनोज चिलंदे, रविकिरण पाटकरी, अनिल जोशी, मनिष ठाकरे, सी.एम. मराठे, संजय आगलावे या पथकाने शाळेतील मुख्याध्यापकांच्या कार्यालयाला टाळे ठोकले.

कारवाईसाठी वसुली पथक वलवाडी परिसरातील चावरा स्कुल येथे धडकताच शाळा प्रशासनाने थकबाकीपोटी असलेला पाच लाखांचा धनादेश पथकाकडे सुपूर्द केल्याने कारवाई स्थगित करण्यात आली. फुलवाला चौकातील चाणक्य डेव्हलपर्स यांच्याकडे असलेल्या थकबाकीचा पाच लाख एकवीस हजारा नऊशे पंच्याण्णव रूपयांचा धनादेश दिला. त्यामुळे जप्तीचे कारवाई थांबविण्यात आली.

# भूमि अभिलेख विभागामार्फत आज पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते स्वामीत्व योजनेतंर्गत सनद वाटप होणार

**धुळे, दि.१७- राज्यातील ग्रामीण भागात मूळ गावठाणामध्ये नागरिकांना त्यांच्या जमिनीची मालकी अर्थात स्वामित्व योजनेतंर्गत सनद वाटपाचा कार्यक्रम देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये शनिवार, १८ जानेवारी, २०२५ रोजी दूरदृष्यप्रणालीद्वारे होणार आहे. धुळे जिल्ह्यात स्वामित्व योजनेतंर्गत सनद वाटपाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, धुळे येथे सकाळी ११.०० वाजता होणार असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख श्रीमती स्वाती लोंढे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

राज्यातील ग्रामीण भागात मूळ गावठाणामध्ये नागरिकांना त्यांच्या जमिनीची मालकी अर्थात स्वामित्व योजनेतंर्गत सनद मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद मोदी यांनी ही महत्वपूर्ण योजना स्वामीत्व योजना म्हणून जाहीर केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये दिनांक १८ जानेवारी, २०२५ रोजी सनद वाटप कार्यक्रम आयोजित करणेत आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे यावेळी जनतेशी आणि स्वामित्व योजनेच्या लाभार्थ्यांशी ऑनलाईन संवाद साधणार आहे.

धुळे जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, धुळे येथे १८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता या कार्यक्रमास राज्याचे पणन व राजशिष्टाचर मंत्री जयकुमार रावल हे उपस्थित राहणार आहेत. तसेच तालुकास्तरावर पंचायत समिती व ग्रामस्तरावर ग्रामपंचायतीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. धुळे जिल्ह्यात स्वामीत्व योजनेतंर्गत चार तालुक्यांत एकूण ४१० गावांना स्वामित्व योजना लागू करण्यात आली आहे. धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यात १९ गावांमध्ये १८ जानेवारी २०२५ रोजी सनद वाटप अभियान राबविण्यात येणार आहे. यासाठी संबंधित गावातील नागरिकांनी १८ जानेवारी रोजी आपल्या मालकी हक्काचा पुरावा म्हणून सनद प्राप्त करुन घ्यावी. यादिवशी ग्रामस्थ तसेच त्या त्या **(पान ३ वर)**

## निधन वार्ता

### अमृतराव पाटील



शिरपूर दि.१७- येथील किसान विद्या प्रसारक संस्थेचे व्यवस्थापक आनंदराव पाटील यांचे वडील आणि थाळनेर येथील माजी सरपंच अमृतराव पुंडलिक पाटील (वय ९३) यांचे वृद्धापकाळाने १७ जानेवारीला सकाळी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा १८ जानेवारीला सकाळी दहाला थाळनेर गावातील दामशेर पाडा येथील राहत्या घरापासून काढण्यात येणार आहे. अमृतराव पाटील यांनी राजकीय व सहकार क्षेत्रातील विविध पदे भूषवली होती.

### शंकरगीर गोसावी



तोरखेडा, दि.१७- येथील प्रगतिशील शेतकरी शंकरगीर मंगागीर गोसावी (८७) यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. ते भटुगीर शंकरगीर गोसावी यांचे वडील होत.


सोफा, डायनींग टेबल, सोफा-कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफिस टेबल व चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणी तुळशी वृंदावन..




शिवम कॉर्पोरेशन
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
मो. 9595397718, 7741018725

**डॉक्टर पाहिजे**
मुकटी येथे (ता.जि.धुळे) मेनरोडवर दवाखान्याचा पूर्ण सेटअप रेडी आहे. intrested Doctor ने संपर्क करावा.
-: संपर्क :-
7744009966
(जैन राहुल)

**सेल! सेल!! सेल!!!**
70% 50% 30% डिस्काऊंट सेल
फस्टक्राय स्टोर
ड्रेसेस व फूटवेअर वर चालू आहे! तरी या सुवर्णसंधीचा लाभ घ्या!!
पत्ता : घ.नं.२८५६, जे.बी.रोड, शिवाजी मेडीकल समोर, धुळे
फो.नं.०२५६२-३५६५३७

**पाहिजेत**
दुकान/ऑफिस कामासाठी हुशार, मेहनती मुले पाहिजेत.
-: संपर्क :-
सम्राट बॅटरीज
पारोळा रोड, धुळे
9823241749
8329784099

**पाहिजेत**
हुशार, अनुभवी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
-: संपर्क :-
मुणोत हॉस्पीटल
नेहरु चौक, देवपूर, धुळे
02562-224407

**भाड्याने देणे**
वलवाडी शिवार आधार नगरला लागून सर्व्हे नं.१२६ मधील पक्के गोडाऊन भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9011894666

**घर विकणे आहे**
ग.नं.५ सिटी सर्व्हे नं.२७२१/१ सागवान कौलारु जुने कडी पटाई सर्व सोयीयुक्त घर विकणे आहे
बाळू मंगीडकर
9422369961
8625029593

**बंगलो व फ्लॅट विकणे आहे**
पारोळा रोड लगत कॉटन मार्केट जवळ 2 BHK फ्लॅट व 4 BHK बंगला विकणे आहे.
-: संपर्क :-
9822545666

**भाड्याने देणे आहे**
ग.नं.४ व ५ बोळ येथे एकविरा कॅसेटच्या वरील दोन गाळे, भगवा चौक येथे १०X१३ चे शॉप भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
8888387548

**भाड्याने देणे आहे**
नगरपट्टी येथे लक्ष्मी डिजीटल समोर तळ घरातील १०X७० चे शॉप दोन्ही बाजुने शटर असलेले दुकान भाड्याने किंवा विकत देणे आहे.
-: संपर्क :-
प्रशांत भावसार फेटेवाले
9422287548

**रो हाऊस घर विकणे**
पार्वती नगर, भाईजी नगर येथील रो हाऊस विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
कॉटन मार्केट समोर प्रभू सिटीच्या बाजुला ३००० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**रोडटच शेती विकणे**
चाळीसगाव रोड टच आणि साक्री रोड टच हॉटेल, मॅरेज लॉन, मंगल कार्यालयासाठी उपयुक्त एक एकर आणि दोन एकर शेती विकणे आहे.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
ऑफिस कामासाठी गरजू मुला-मुलींची त्वरीत भरती चालू आहे
वय : १८ ते ३० वर्षे/ शिक्षण १० वी पास/ नापास ते पदवीधर पगार : ७ हजारच्या पुढे
रहाणे + जेवण + मेडिकल मोफत
संपर्क :- वाडीभोकर रोड, धुळे/9657608459

**पाहिजेत**
आकऊन्टींगचा कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा किवा मुलगी पाहिजे.
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजेअरी
गल्ली नं.२, मुल्लाबाडा रोड अकबर चौक, धुळे
मो.नं.९४२२२८६९५८
७३५०१४८९५५

**ऑपरेटर पाहिजे**
झेरॉक्सच्या दुकानावर कॉम्प्युटरचे नॉलेज असलेली ऑपरेटींगसाठी होतकरु मुलगी आकर्षक पगारावर लावणे आहे.
-: संपर्क :-
संजय झेरॉक्स सेंटर
राणाप्रताप चौक, धुळे
9511836404

**घर भाड्याने देणे**
२४ तास पाणी (बोअरिंग/मनपा.), ३ रुम, संडास/बाथरूम, बस स्थानक, रेल्वे स्टेशन, बाजारपेठ दोन मिनिटावर...
-: संपर्क :-
9420659211
8830672162

**पाहिजेत**
मेडीकल होलसेल दुकानात कामासाठी महिला/मुली/मुले पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकोन्टंट
२) टेलीफोन कॉलींगसाठी
३) मदतनिस
संजय मेडीकल्स
गल्ली नं.२, धुळे
8483032975
9881118707

**गरम पाण्याचा एकच उपाय...**




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...

57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०